# १. गरजाधिष्ठित उपक्रम

## (अ) संस्कृती आणि कार्यजगताची ओळख

### १.१ पाऊस



टपटप टपटप पाऊस पाणी
भरभर भरभर गाते गाणी
झुळझुळ झुळझुळ वाहत आले
सरसर सरसर भरले नाले
झरझर झरझर झाडे भिजली
सळसळ सळसळ पाने हसली
टपटप टपटप पाऊस पाणी
चला गाऊया पाऊस गाणी
चला गाऊया पाऊस गाणी।।

### माझी कृती

बडबडगीत अभिनयासह म्हणा

वृत्तपत्रे, मासिके यांतून तसेच स्वरचित बडबडगीते संकलित करावीत. योग्य उच्चारांसह विद्यार्थ्यांकडून म्हणून घ्यावीत. उच्चार स्पष्ट असावेत. प्रसंगानुसार बडबडगीते म्हणण्यास उत्तेजन द्यावे.

## १.२ कार्यजगत




चित्रे दाखवून परिसरातील विविध उद्योगांविषयी माहिती सांगावी. चित्र वर्णन घ्यावे.

## १.३. परिसराची ओळख











चित्रांचे निरीक्षण आणि त्यावरून वर्णन करायला सांगावे. परिसरातील भाजीबाजार/मंडई, दुकाने, शाळा, दवाखाने इत्यादींना भेट देऊन वर्गात मुक्तपणे चर्चा करून घ्यावी.

## १.४ वर्ग सुशोभन

तुम्हांला कोणता वर्ग आवडेल? त्या खाली ☑ अशी खूण करा.






वर्ग सजवण्यासाठी मी वापरलेले साहित्य









## माझी कृती

वर्ग सुशोभन करताना हेसुद्धा साहित्य वापरता येईल. चित्रे चिकटवा.


दोन्ही चित्रांची तुलना करून घ्यावी. वर्ग सुशोभन करताना भिंती, व्हरांडा, पायऱ्या, जिने, खिडक्या या ठिकाणी वस्तूंची कशी मांडणी केली आहे यावर चर्चा करून घ्यावी. वर्ग सुशोभनासाठीच्या वस्तू चिकटवून घ्याव्या.

## १.५ पाणी पिण्याच्या पद्‌धती










## माझी कृती










चित्रांचे निरीक्षण करायला सांगून प्रत्येक चित्रातील पाणी पिण्याच्या पद्‌धतींविषयी विचारावे. विद्यार्थ्यांना चित्र ओळखायला सांगावे.

## (ब) जलसाक्षरता

### पाण्याचे स्रोत



पावसा पावसा ये ये
पाणीच पाणी होऊ दे
तलाव, धरणे, विहिरी भरतील
प्राणी, पक्षी पाणी पितील.

## माझी कृती



चित्रामध्ये कावळा व भांडे दिसत आहे त्यावरून गोष्ट सांगा.

चित्रातील पाण्याचे स्रोत ओळखायला सांगावे. चित्रातील प्राणी ओळखायला सांगावे. बडबडगीत वैयक्तिक आणि सामूहिक म्हणून घ्यावे.

## पाण्याचा वापर

खालील चित्रांचे निरीक्षण करून योग्य अयोग्य ओळखा. योग्य चित्रापुढे ✓ अशी खूण तर अयोग्य चित्रापुढे ✗ अशी खूण करावी.













वरील चित्रांच्या मदतीने जलसंवर्धनाचे महत्त्व आणि पाणी बचतीचे विविध मार्ग यांविषयी विद्यार्थ्यांशी चर्चा करा.

## (क) आपत्ती व्यवस्थापन

चित्र पहा आणि ओळखा.

















चित्रांवरून ऋतुंची ओळख करून द्यावी. चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. पाऊस, पूर, वादळ, खवळलेला समुद्र, विजा, ढगांनी भरलेले आकाश, सूर्योदय, सूर्यास्त, चंद्र, चांदणे, भरती, ओहोटी, जंगल इत्यादी नैसर्गिक गोष्टींद्वारे निसर्गाची ओळख करून द्यावी. प्रश्न विचारून वर्णन करून घ्यावे.

## चित्रांचा क्रम लावून गोष्ट तयार करा.






## माझी कृती


चित्रांवरून गोष्ट तयार करा.

R7KP5Z









चित्रांचा योग्य क्रम जुळवून घ्यावा. चित्रांवरून गोष्ट तयार करून घ्यावी.